N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** गडचिरोली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0197 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/03/2025 15:12

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 03/02/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/03/2025

**Time From (वेळेपासून):** 19:33 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/03/2025 **Time (वेळ):** 12:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/03/2025 15:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लाप्रवि कार्यालय गडचिरोली, यथे फिर्यादीचे मोबाईलवर,गडचिरोली , 442605

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** केशव भाऊराव धोटे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** भाऊराव धोटे
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वैनगंगा नगर वार्ड क्रं 4 ,सिआरपीएफ कॅम्प समोर नवेगाव,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |
| 2 | स्थायी पता | वैनगंगा नगर वार्ड क्रं 4 ,सिआरपीएफ कॅम्प समोर नवेगाव,गडचिरोली, गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-7350271778

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ श्री. संभाजी भोकरे | | | 1. प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी, भामरागड,भामरागड,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

फिर्यादीचे लेखी रिपोर्टवरुन लागलीत

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणक | सॅनडीक्स कपनीचे 32 जिबी मेमरीकार्ड 05 नग | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

0.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस स्टेशन गडचिरोली
दिनांक:-26/03/2025

नाव:- श्री. केशव भाऊराव धोटे, वय 56 वर्षे, धंदा-नोकरी, आरोग्य सहाय्यक, सध्या - निलंबित मुख्यालय टेकडाताला ता. सिरोंचा जि. गडचिरोली रा. वैनगंगा नगर वार्ड क्र. 4, सिआरपीएफ कॅम्पच्या समोर नवेगाव, गडचिरोली ता.जि. गडचिरोली मो.क्र. 7350271778

मी व माझी पत्नी सौ. प्रज्ञा केशव धोटे सह दि. 03/02/2025 रोजी ला.प्र.वि. गडचिरोली येथे हजर राहून श्री चंद्रशेखर ढोले, पोलीस उपअधिक्षक यांची भेट घेउन माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व त्यावर श्री. ढोले साहेब यांनी माझ्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील हे पुढील कारवाई करतील असे सांगितले. पोनि पाटील यांना माझ्याकडे होणा-या लाच मागणीबाबत थोडक्यात माहिती दिली असता पोनि पाटील यांनी तक्रार लेखी स्वरूपात माझे हस्ताक्षरात देण्यास सांगून कोरा कागद व पेन उपलब्ध करून दिले त्यावर मी त्यांना माझी एका लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने लेखी तक्रार स्वाक्षरी करून दिली. मी दिलेली लेखी तक्रार खालीलप्रमाणे.

मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय गडचिरोली येथे आज दिनांक 03/02/2025 रोजी माझी पत्नी सौ.प्रज्ञा केशव धोटे हिच्यासह हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासह राहण्यास असुन मी यापुर्वी लाहेरी येथे आरोग्य सहायक या पदावर कार्यरत होतो. सध्या निलंबित असुन प्राथमिक आरोग्य केंद्र टेकडाताला येथे नियुक्तीस आहे.

मी जुलै 2023 पासून प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येथे आरोग्य सहायक या पदावर कार्यरत होतो. सदर ठिकाणी वैद्यकीय अधिकारी श्री. भोकरे साहेब, लाहेरी प्रा.आ.केंद्र यांचे अधिनस्त कार्यरत होतो. प्रा.आ.केंद्र, लाहेरी ठिकाणी कार्यरत असतांना एम.ओ. डॉ. श्री. भोकरे यांनी माझे माहे फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 पर्यंतचे पगार आकारले नसल्याने ते मला मिळालेले नाहीत. यांनतर मला एम.ओ. यांच्या रिपोर्टवरुन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम, जिल्हा परीषद गडचिरोली यांनी निलंबिन आदेश काढुन मला निलंबित करून प्रा.आ.केंद्र टेकडाताला येथे निलंबन कालावधीतील नियुक्ती दिल्याने मी दि. 14/11/2024 रोजी सदर ठिकाणाहून कार्यमुक्त होवून टेकडाताला ता. सिरोंचा जि. गडचिरोली येथे हजर झालो आहे. मला प्रा.आ.केंद्र लाहेरी येथून माहे ऑक्टोबर 2024 चे वेतन मिळालेले असून प्रा.आ.केंद्र लाहेरी येथील माझे माहे फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे पगार वैद्यकीय अधिकारी श्री. भोकरे साहेब, लाहेरी प्रा.आ.केंद्र यांनी थांबवुन ठेवला होता.

दि.28/01/2025 रोजी दुपारी 03.15 वा. मी गडचिरोली जात असतांना मला डॉ. श्री. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र लाहेरी यांनी त्यांचा मो.क्र. 7743925289 यावरुन माझा फोन नंबर 7350271778

यावर फोन करून कोठे आहा अशी विचारणा केली असता मी त्यांना गडचिरोली आहे असे सांगीतल्यावर त्यांनी मला काय खोटे बोलता असे सांगुन फोन बंद केला. म्हणुन मी पुन्हा 03.16 वा. फोन केला परंतु फोन लगेच कटला म्हणुन मी गडचिरोली येथे घरी गेल्यावर दिनांक 30/01/2025 रोजी त्यांना फोन लावण्याचा प्रयत्न केला परंतु फोन लागला नाही.

दि.01/02/2025 रोजी दुपारी 01.16 वा. मी माझ्या गडचिरोली येथील घरी माझी पत्नी सौ. प्रज्ञा हिच्यासोबत घरी असतांना मी तिच्या समोर माझे मो.क्र. 7350271778 वरून वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. संभाजी भोकरे यांचे मो.क्र. 7743925289 वर कॉल केला व दिनांक 28/01/2025 रोजी कशासाठी फोन केले याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला ''तुमचे फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे पगार काढायचा आहे की नाही असे बोलले तेव्हा मी त्यांना हो असे म्हणालो. त्यावेळी त्यांचा फोन कटला म्हणुन मी पुन्हा त्यांना नॉर्मल कॉल केला असता त्यांनी मला व्हाटसप कॉल करतो असे सांगुन त्यांच्या मो.क्र. 7743925289 यावरुन माझा व्हाटसप नंबर मो.क्र. 7350271778 याच्यावर 01.18 वाजता मिस कॉल दिला. त्यावर मी त्यांना 01.19 वा. व्हाटसप कॉल केला असता त्यांनी मला 'तुमचे फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे पगार काढायचा असेल तर तुम्हाला माझे नो डयु सर्टीफिकेट लागेल, ते पाहीजे का नाही , तुमचा पगार काढायचा का नाही' असे विचारले त्यावर मी हो सर मला 8 महिन्यांचा पगार मिळालेला नाही तुंम्ही प्रमाणपत्र दिले तर माझे बिल निघुन जाईल असे सांगीतले. त्यांवर त्यांनी मला 'मी तुझे फेब्रुवारी ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे पगार मिळणेकरीता ना देय प्रमाणपत्र देतो, पण त्याकरीता तु मला 1,50,000/-रू. दे' असे बोलले. तेव्हा मी माझेकडे एवढे पैसे नाहीत असे बोललो असता त्यानी मला सांगीतले की ते मला काही माहीत नाही तु दिड लाख रुपये दे आणी तुझे पगाराचे नो डयु सर्टीफिकेट माझ्याकडुन घेवुन जा, पैसे नसेल देणार तर सर्टीफिकेट मिळणार नाही' असे सांगीतले असता मी व माझी पत्नी प्रज्ञा हिने डॉ. श्री. भोकरे यांना आमच्याकडे एवढे पैसे नाहीत , आठ महिने पगार नसल्यामुळे आमच्यावर कर्ज झाल्याचे सांगुन पैसे देण्यास असमर्थ असल्याचे सांगुन नो डयु सर्टिफिकेट देवुन देण्याची विंनती केली परंतु त्यांनी माझी पत्नी व माझी विंनती न ऐकता मला सांगीतले की 'तु मंगळवारी 04/02/2025 ला लाहेरी येथे 1,50,000/-रू. आणुन दे आणी तुझे ना देय प्रमाणपत्र घेवून जा, पैसे नाही दिले तर नो डयु प्रमाणपत्र देणार नाही, तुमचा पेन्डींग पगार निघणार नाही, पैसे दिले की बाबुला सांगुन प्रमाणपत्र सही करुन देतो , हो आणी पैसे आणून देण्याच्या एक दिवस पुर्वी फोन करून ये' असे म्हणून मला व्हाटसप कॉल करुन लाचेची मागणी केली . यानंतर त्यांनी पुन्हा मला 01.25 वा. व्हाटसप कॉल करुन 'पैसे मागीतल्याचे कोणाला सांगीतले तर नो डयु सर्टिफिकेट देणार नाही तुला पगार मिळणार नाही' असे सांगुन कोणाला काही सांगणेस मनाई केली होती.

डॉ.श्री. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र लाहेरी यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नाही अथवा भांडण नाही तसेच कोणतीही आर्थीक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु डॉ. श्री. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केंद्र लाहेरी यांनी मला मी लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे रोखलेल्या पगाराकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता 1,50,000/-रूपये लाच रक्कमेची मागणी केली आहे. डॉ.श्री. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र लाहेरी यांना 1,50,000/- रूपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता माझी पत्नी सौ. प्रज्ञा केशव धोटे हिच्यासोबत आपल्या कार्यालयात समक्ष येवुन स्वेच्छेने तक्रार देत आहे.

त्यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन शासकिय पंचांना बोलावून त्यांची व माझी ओळख करून दिली. तसेच त्यांच्या कार्यालयातील हजर स्टाफची मला व पंचांना ओळख करुन दिली. पोनि पाटील यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिले. तसेच मी त्यांना माझी सदरची तक्रार समक्ष सांगीतली त्यांची खात्री करुन सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी व पोनि पाटील यांनी स्वाक्षरी केली.

मला डॉ. श्री. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी यांनी दि. 04/02/2025 रोजी लाहेरी येथे लाच रक्कम घेवुन बोलाविले व येण्याआधी एक दिवस पुर्वी फोन करून येण्यास सांगितले असल्याने तसेच लाहेरी हे ठिकाण गडचिरोली पासुन खुप दुरवर अतिदुर्गम नक्सलग्रस्त अतिसंवेदनशील धोकेदायक भागात असल्याने दोन्ही पंचासमक्ष ला.प्र.विभाग, गडचिरोली कार्यालयातूनच माझे मोबाईल वरून डॉ. श्री. संभाजी भोकरे

यांचा मोबाईल वर फोन करुन स्पिकर ऑन करुन लाचेची मागणी संबंधाने प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा व पडताळणी मध्ये लोकसेवक डॉ.श्री. संभाजी भोकरे, यांची लाचेची मागणी असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यानुसार पुढील सापळा कार्यवाही करण्याचा दोन्ही पंचासमक्ष निर्णय घेतला.पोनि पाटील यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोशी संदिप घोरमोडे यांनी त्यांच्या कार्यालयात असलेले सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करते याबाबत पंचांसमोर सविस्तर माहीती देवुन सदरचे व्हाईस रेकॉर्डरचा वापर करुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला, माझी पत्नी सौ. प्रज्ञा धोटे व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना देवून पोनि पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोशि संदिप घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन व्हॉईस रेकॉर्डर रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 19.33 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी करीत असल्याचे संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर माझे मोबाईलने गै.अ. यांचे मोबाईलवर फोन केलो असता नेटवर्क मुळे संपर्क तुटल्याने पुन्हा मी त्यांना फोन लावण्याचा प्रयत्न केला परंतु फोन न लागल्याने पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 19.36 वा. बंद केले.

त्यानंतर मी पोनि पाटील साहेबांना डॉ. भोकरे हे दुर्गम भागात कार्यरत असल्याने त्या ठिकाणी व्हाटसप कॉलव्दारे चांगला संपर्क होत असल्याचे सांगितल्याने व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 19.41 वा. रेकॉर्डीग मोडवर ठेवुन माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने गै.अ. यांचा Dr. Bhokare या नावे सेव्ह असलेला व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 वर व्हॉटसअँप कॉलद्वारे संपर्क केला असता कॉल लागल्यावर मी डॉ. भोकरे यांना सर, मी काय म्हणतो, झालं का ते आपलं ना देय प्रमाणपत्र असे बोललो असता गै.अ. यांनी हो, झाल्यातच जमा आहे असे नादेय प्रमाणपत्र संबंधाने बोलत असतांना नेटवर्क मुळे संपर्क तुटल्याने पंच क्र. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 19.49 वा. बंद केले.

त्यानंतर पुन्हा पोशि घोरमोडे यांचे हस्ते व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 19.59 वा. पंच क्र. 1 यांच्या आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर मी गै.अ. यांचे व्हॉटसअँप मोबाईल क्र. 7743925289 वर व्हॉटसअँप कॉलद्वारे संपर्क केला असता गै.अ. यांनी मला ' मी तुम्हाला नंतर बोलतो थोडासा कामात आहे असे सांगितल्याने मी गै.अ. यांना अर्ध्याक तासात का असे विचारलो असता त्यांनी हो असे सांगितल्याने पंच क्रं.र. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 20.01 वा. बंद केले.

डॉ. भोकरे हे मला पुन्हा फोन करणार असल्याने त्यांचे कॉल येण्याची वाट पाहत असतांना माझे मोबाईल व्हॉटसप नं. 7350271778 यावर 20.33 वा. डॉ. भोकरे यांचा व्हाटसप मोबाईल नं 7743925289 या वरून व्हॉटसप व्हाईस मिस कॉल आल्याने व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 20.34 वा. पंच क्र. 1 यांचे आवाजात संभाषण रेकॉर्ड करून माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने डॉ. भोकरे यांचे व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 वर संपर्क केलो असता डॉ. भोकरे यांनी मला ''मंग केवढे जमणार, नाही खुप कमी बोलून दिलो उलट मी तुम्हाला. मी खर तर दुसरा असता तर फिप्टी-फिप्टी बोलला असता सरळ पन्नास-पन्नास टक्के बोलला असता, बघा मगं तुमच्या मनानी, पाया पडायची गरज नाही, न पाया तर माझ्या पडु नका माझ्या, तुम्ही न जे आहे मी म्हणलं तेच करुन टाका, नाही बघु आता त्याचा मंग,तुम्हाला डिएचओ सरांकडे प्रस्ताव पाठवा लागल तुमचा कि पगार काढू नका म्हणून कुठुनच, इकडून नाही, तिकडून पण नाही, कुठुनचं नाही, मंग तुम्ही ACB फिर्याद

सांगा मंग, तुम्ही सांगा न मंग किती कमी शकतो त्याच्यातून,नाही -नाही, ते खूप कमी होतात, असं काही नाही बघा मंगळवारी म्हणून तुम्ही अजून दोन तीन दिवस घ्या, हप्ता घ्या वाटलास तर, काही टेंन्शन नाही, नाही म्हणजे अजून एक आठवडा घ्या, नाही तं मी कुठं किस्त करुन देणार आहे. आपलं एकदाचं फायनल करुन टाकायचं, फुल अँन्ड फायनल, पुन्हा एकमेकांला का, पुन्हा बोलत राहिल्यानंतर, एका हाताने देवून टाका एका हाताने घेवून टाका निपटून

टाका, पुन्हा पुन्हा फोन कराची गरज नाही, दिड लाखापेक्षा काय कमी बोलू तुम्हाला, दिड लाखच तर कमी केले होते मी, एक तीस पाठवुन द्या मग, एक.. तिस पाठवून द्या म्हणलं, एक -तिस तिस, तिथला तेवढ, तिकडचा काही माहिती नाही बाबा मला, तुम्हाला मी इथला ना देय देवून टाकतो, मी इकडून पगार नाही काढले म्हणुन, तुम्ही तिकडचा बघुन घ्या काय आहे तर ''अशा प्रकारे बोलणी करून मला प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे रोखलेल्या पगाराचे पुरवणी बिलाकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता 1,50,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती 1,30,000/-रू. प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली. यानंतर पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 20.45 वा. बंद केले.

यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण डॉ. भोकरे यांनी मला प्रा.आ. केंद्र लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे रोखलेल्या पगाराचे पुरवणी बिलाकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता 1,50,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती 1,30,000/-रू. प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी येथे स्विकारण्याची संमती दर्शविल्याचे खात्री केली. डॉ. भोकरे यांनी पैसे जमल्यानंतर एक आठवडयात लाहेरी येथे लाच रक्कम आणून देण्यास सांगितल्याने मला पोनि पाटील साहेबांनी डॉ. भोकरे यास लाच रक्कम देणेकरीता 1,30,000/-रू. रोख रक्कमेची व्यवस्था झाल्यानंतर कारवाई कामी हजर राहणेस सांगितले. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे.

दि.13/02/2025 रोजी वैयक्तीक बचत व उसनवारीतुन 1,30,000/-रू. ची व्यवस्था करून ला.प्र. वि गडचिरोली येथे मी व माझी पत्नी सौ. प्रज्ञा धोटे सह हजर येवून डॉ. भोकरे यांचेविरूध्द कारवाई करण्याची विनंती केली. त्यानुसार पोनि पाटील साहेबांनी सापळयाचे आयोजन करून दोन शासकिय पंचांना बोलाविले. सापळा कारवाई करीता वैयक्तीक बचत व उसनवारीतुन 1,30,000/- (रू. 500/- दराच्या 260 चलनी नोटा) पोनि पाटील यांचेकडे हजर केले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन पोहवा किशोर जौजांळकर यांनी गुणधर्म सांगीतले. नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर सदर रक्कम एका लिफाप्यात ठेवले.

मी टेकडाटाला येथे कर्तव्यावर हजर असतांना डॉ. भोकरे यांनी मला त्यांचे व्हाटसप मो.नं. 7743925289 यावरून माझे व्हाटसप मो. क्र. 7350271778 वर दिनांक 05/02/2025 रोजी व दि. 06/02/25 रोजी व्हाटसप मिसकॉल येवुन गेल्याचे पोनि पाटील साहेबांना दाखविले. डॉ. भोकरे यांनी लाच रकमेची व्यवस्था झाल्यानंतर फोन करून येण्यास सांगीतले असल्याने तसेच मी डॉ. भोकरे यास देणेकरीता लाच रक्कम 1,30,000 /-रू. हजर केल्याने पोनि पाटील साहेबांनी डॉ. भोकरे यांचेकडून लाच रक्कम स्विकारण्यासाठीचे ठिकाण वेळ व दिनांक निश्चित करण्याकरीता ला.प्र.विभाग, गडचिरोली कार्यालयातूनच तक्रारदार यांचे व्हाटसप मो. क्र. 7350271778 वरून डॉ. भोकरे यांचा व्हाटसप मो.क्र. 7743925289 वर फोन करून स्पिकर ऑन करुन संपर्क करण्याचा पंचासमक्ष निर्णय घेतला.त्यानंतर पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला, माझी पत्नी सौ. प्रज्ञा धोटे व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना देवून पोनि पाटील साहेबांचे सुचनेनुसार पोशि घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन व्हॉईस रेकॉर्डर रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 19.04 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने गै.अ. यांचे व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 यावर संपर्क केले असता डॉ. भोकरे यांनी कॉल रिसीव्ह केल्यानंतर मी त्यांना बाबु श्री खोब्रागडे यांचा काही दिवसांपुर्वी कॉल आला असल्याचे व त्यांनी ना देय प्रमाणपत्र तयार असल्याचे तसेच आपले देखील मिस कॉल आल्याचे सांगुन प्रमाणपत्र घेणेसाठी कधी यायचे याबाबत विचारलो असता त्यांनी ''लाहेरी येथे नसुन गडचिरोली येथे मिटींग करीता येणार असल्याचे सांगुन पुन्हा बाबु सोबत प्रमाणपत्राबाबत बोलुन कळवितो असे सांगीतल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 19.07 वा. बंद केले.

पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 20:06 वा. पंच क्र. 1 यांच्या आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर मी व्हॉटसअॅप कॉलद्वारे गै.अ. यांचे मोबाईल क्र. 7743925289 वर संपर्क केला असता गैरअर्जदार

यांनी कॉल रिसीव्ह न केल्याने त्यांना पुन्हा 20.09 वा. कॉल केला परंतु गैरअर्जदार यांनी कॉल रिसीव्ह न केल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 20.10 वा. बंद केले.

त्यानंतर पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन रेकॉर्डींग मोडवर ठेवुन वेळ 20:53 वा. पंच क्र. 1 यांच्या आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर मी व्हॉटसअँप कॉलद्वारे गै.अ. यांचे मोबाईल क्र. 7743925289 वर संपर्क केला असता त्यांनी कॉल रिसीव्ह न केल्याने मी पुन्हा गैरअर्जदार यांना व्हॉटसअँप द्वारे कॉल केला असता गैरअर्जदार यांनी कॉल रिसीव्ह करून मला माझा थकीत पगार मिळणेसाठी मोबाईल व्हाटसपवर अर्ज पाठविणेस सांगीतले. व नंतर बोलावल्यावर भेटण्यास सांगुन फोन कट केल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 20.59 वा. बंद केले.

यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकले व मला व माझी पत्नीला गै.अ. डॉ. भोकरे यांनी थकीत पगाराबाबत अर्ज लिहुन स्वताच्या व्हाटसपवर पाठविणेस सांगीतल्याने अर्ज लिहुन डॉ. भोकरे यांना पाठवुन द्या, घरी असतांना त्यांचेसोबत काही बोलणे झाल्यास झालेल्या संभाषणाबाबत दि. 14/02/2025 रोजी हजर होवुन पंचांच्या उपस्थितीमधे झालेले संभाषण कथन करून तसे सविस्तर लेखी निवेदन आंम्हास द्यावे. अशा सुचना देवून कार्यवाही स्थगित केली. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 2 मध्ये नमुद आहे.

यानंतर दि. 28/02/2025 रोजी 10.46 वा. लाहेरी पिएचसी येथील श्री. खोब्रागडे बाबु यांनी माझी पत्नी सौ. प्रज्ञा हिचे व्हॉटसप नंबरवर फोन करून डॉ. भोकरे हे लाहेरी येथे आलेले असून त्यांनी धोटेजींना नादेय प्रमाणपत्र संबंधाने फोन करण्यास सांगितले आहे. तरी तुम्ही धोटे जी यांना सांगून डॉ. भोकरे यांना फोन करा व बोलून घ्या, असे सांगितल्याने मी व माझी पत्नी सौ. प्रज्ञा धोटे सह तात्काळ 11.00 वा. ला.प्र.वि. गडचिरोली येथे हजर येवून पोनि पाटील साहेबांना भेटून खोब्रागडे बाबूचा फोन आल्याबाबत सांगून डॉ. भोकरे यांचेविरूध्द पुढिल कारवाई करण्याची विनंती केली. त्यानुसार पोनि पाटील साहेबांनी सापळ्याचे आयोजन करून दोन शासकिय पंचांना बोलाविले.

त्यानंतर मला, माझी पत्नी सौ. प्रज्ञा धोटे व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना देवून पोनि पाटील साहेबांचे सुचनेनुसार पोशि घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन व्हॉईस रेकॉर्डर रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 13.36 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने गै.अ. यांचे व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 यावर संपर्क केलो असता डॉ. भोकरे यांनी कॉल रिसीव्ह केला तेव्हा मी 'हॅलो सर, बाबुजी फोन करायला सांगितले होते', असे म्हणता डॉ. भोकरे यांनी 'कामात आहे, अर्धा घंटयात फोन करतो' असे सांगून फोन कट केल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 13.37 वा. बंद केले.
डॉ. भोकरे हे अर्धा घंटयात फोन करणार असल्याने त्यांचे कॉल येण्याची वाट पाहत होतो. परंतु अर्धा तास होवून सुध्दा डॉ. भोकरे यांचा कॉल न आल्याने पुन्हा व्हॉटसप कॉलद्वारे संपर्क करण्याचा निर्णय घेवून पोनि पाटील साहेबांच्या सुचने वरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन वेळ 14.32 वा. पंच क्र. 1 यांच्या आवाजात संभाषण रेकॉर्ड करून रेकॉर्डीग मोडवर ठेवले. त्यानंतर मी माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने गै.अ. यांचा व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 यावर दोनदा व्हाटसप कॉल करून देखील रिसीव्ह केला नसल्याने काहीवेळाने पुन्हा एकदा मी त्यांना संपर्क केला असता डॉ. भोकरे यांनी कॉल रिसीव्ह करून ''कामात आहे , बाहेरून अधिकारी आलेले आहेत. तुंम्हाला 15 मिनीटांनी फोन करतो'' असे सांगूण फोन कट केल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 14.40 वा. बंद केले.

यानंतर डॉ.भोकरे यांचे कॉल येण्याची वाट पाहत असतांना डॉ. भोकरे यांचे 14.56 व 14.57 वा. दोन व्हॉटसप मिस कॉल आल्याने पोनि पाटील साहेबांच्या सुचने वरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन वेळ 15.31 वा. पंच क्र. 1 यांच्या आवाजात संभाषण रेकॉर्ड करून रेकॉर्डीग मोडवर ठेवले. यानंतर मी माझे व्हॉटसप मोबाईल क्र. 7350271778 ने डॉ. भोकरे यांचा व्हॉटसप मोबाईल क्र. 7743925289 यावर संपर्क केले असता डॉ. भोकरे यांनी कॉल रिसीव्ह केला तेव्हा मी त्यांना नमस्कार करून नादेय प्रमाणपत्राबाबत विचारलो असता त्यांनी मला 'तुमचा काम रेड्डी आहे, सोबत येतांना व्हाटसपवर पाठवलेला अर्ज घेवुन रविवारी 12 वाजता पोहचणा-या बस नी येवून जा' असे सांगीतले असता मी व माझी पत्नी असे दोघे डॉ. भोकरे यांच्यासोबत कामासंबंधी बोलणी

करून फोन कट केल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 15.36 वा. बंद केले.

यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण खात्री केली व मला रविवार दि. 02/03/2025 रोजी सकाळी 06.00 वा. ला.प्र.वि. गडचिरोली येथे हजर राहण्याची सूचना दिल्या. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 3 मध्ये नमुद आहे.

त्याप्रमाणे मी दि.02/03/2025 रोजी ला. प्र. वि. गडचिरोली येथे हजर आलो. यानंतर ला.प्र.वि कार्यालयातील दोन शासकीय वाहनाने पोनि पाटील साहेब, मा. ढोले साहेब, पोलीस उपअधीक्षक, पोनि राठोड साहेब, दोन्ही पंच, सापळा पथक ला.प्र.वि. गडचिरोली येथून 07.35 वा. लाहेरी येथे जाणेकरीता निघालोत. रस्त्या दरम्यान मला डॉ. भोकरे यांचे मोबाईल नंबर 7743925289 यावरून 09.13 , 09.18 व 09.20 वाजता तिनदा मिस कॉल आले. म्हणुन मी पंचासमक्ष डॉ. भोकरे यांना 09.25 वा. फोन केला असता त्यांनी '' तुम्ही कुठे आहात , मी आलापल्ली येथेच आलो आहे, तुम्ही लाहेरी जावु नका मला अहेरीला आल्यावर फोन करा, मी अहेरीला येतो, मी सांगतो तुंम्हाला परत कुठे भेटायचे ते, तुंम्हाला यायाला किती वेळ आहे कळवा,'' असे पंचासमोर सांगितले, असता मी त्यांना ''एक दिड तासात अहेरीला पोहोचतो आणी तेथुन तुंम्हाला फोन करतो'' असे सांगीतले. त्यावरून पोनि पाटील साहेबांनी अहेरी येथे पुढील सापळा कारवाई करण्याचा दोन्ही पंचासमक्ष निर्णय घेतला. यांनतर शासकीय दोन्ही वाहनांसह अहेरी येथील बसस्थानक जवळ 10.25 वा. पोहचलो. व अहेरी येथील बसस्थानकाचे वर्कशॉप डेपो शेड येथे कॅम्प लावले. त्यानंतर माझी अंगझडती घेवून अँथ्रॉसिन पावडर लावलेली 1,30,000/- लाचेची रक्कम माझे पॅन्टचे समोरील उजव्या खिशात पोशि जेट्टीवार यांच्या करवी अलगत ठेवले त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना दिल्या.
पोनि पाटील साहेबांच्या सुचनेनुसार पोशि घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 11.04 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवले. यानंतर मी डॉ. भोकरे यांना फोन केलो असता त्यांनी मला बसस्थानक अहेरी येथे येण्यास सांगितल्याने मी पंच क्रं. 1 सह बस स्थानक अहेरी येथे गेलो. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटागटाने माझे मागोमाग येवून बस स्थानक अहेरीच्या आजुबाजुस काही अंतरावर थांबून होते. मी, पंच क्र. 1 सह बस स्थानक अहेरी येथे कंम्पाउंडच्या आतमधे मंदिराच्या ओट्यावर बसुन गैरअर्जदार यांच्या येण्याची वाट पाहत होतो. काही वेळाने डॉ. भोकरे यांची काळ्यां रंगाची कार बसस्टॅन्ड समोरून पेट्रोलपंपकडे जातांना दिसली व नंतर तिच कार परत फिरून गावात गेल्याचे मला दिसले. म्हणून काहीवेळ डॉ. भोकरे यांचे येण्याची वाट पाहत थांबून होतो. परंतु ते बसस्टॅन्डमधे न आल्याने मी डॉ. भोकरे यांना कॉल केलो असता त्यांनी बसस्टॅन्ड समोरून गेल्याचे सांगुन आंम्ही त्यांना दिसलो नसल्याचे सांगीतले. तेव्हा मी त्यांना आंम्ही बसस्टॅन्डच्या आवारातील मंदिराचे चबुत-यावर बसल्याचे सांगुन आत येण्याची विंनती केली तेव्हा डॉ. भोकरे यांनी बर बर ठिक आहे येतो असे सांगितले. काही वेळाने डॉ. भोकरे यांनी मला फोन करून पेट्रोलपंपावर थांबल्याचे सांगुन मला एकटयालाच पेट्रोलपंपासमोर बोलावले. त्यानंतर मी, पंच क्र. 1 सह बसस्थानकाच्या बाहेर निघून पेट्रोलपंम्पकडे जाण्यास निघालो तेव्हा डॉ. भोकरे यांची काळ्या रंगाची कार थांबलेली होती. मी त्यांच्याजवळ पोहोचत असतांना ते हळु हळु आपली कार घेवुन पुढे पुढे जावु लागले. मी त्यांना हाताने थांबण्याचा इशारा केला परंतु ते तसेच पुढे निघाल्याने मी त्यांना चालता चालता फोन केला असता त्यांनी मला ''तुमच्या सोबत कोण लोक आणले आहेत, ते पेट्रोलपंपामधे दोन मोटारसायकलवर चारजण बसुन होते. पैसे देवुन निघुन गेले असते ना गप, तुमचा काहीतरी प्लनिंग दिसतो आहे, आता मी तुम्हाला लाहेरीलाच बोलावतो, मी एकट्याला बोलावलो होतो, तुंम्ही सोबत लोक आणले, तुंम्ही काहीतरी गडबड करणार असे दिसतेय असे सांगितल्याने मी त्यांना मी एकटाच येतो सर असे सांगुन पंच क्र. 1 यांना मागुन गाडी घेवुन येण्यास सांगून पायी पायी रस्त्याने त्यांच्या कारच्या मागेमागे चालत जाऊन समोर एका पान टपरीवर थांबलो. तेव्हा पंच क्र. 1 हे त्या ठिकाणी आले तेव्हा मी त्यांना इशारा करून डॉ. भोकरे यांना दोन तिन वेळा फोन लावलो परंतु डॉ भोकरे यांचा फोन स्विच ऑफ दाखवित होता. काहीवेळ आंम्ही त्याच ठिकाणी डॉ. भोकरे यांची येण्याची वाट पाहत थांबून होतो. परंतु बराच वेळ वाट पाहून सुध्दा ते आले नाही. त्यानंतर मी केलेल्या इशा-यावरून पोनि पाटील साहेब, सापळा पथक जवळ आले. व पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 12.47 वा. बंद केले. पोनि पाटील साहेबांनी झालेल्या घटनेबाबत पंच क्र. 1 व मला विचारणा केली. यानंतर सर्व मिळून कॅम्प अहेरी येथील बसस्थानकाचे वर्कशॉप डेपो शेड येथे आलोत. यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेवून माझे पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवलेले अँथ्रॉसीन पावडर लावलेले 1,30,000/-(500/- दराची 260 नोटा ) पोशि जेट्टीवार यांच्या करवी काढुन एका लिफाप्यात ठेवले.

यानंतर त्या ठिकाणाहून ला. प्र. वि गडचिरोली येथे 17.10 वा. परत आलोत. त्यानंतर पोनि पाटील साहेबांनी दोन्ही पंचांसमक्ष संभाषण ऐकून गै.अ. डॉ. भोकरे हे सापळा कारवाई दरम्यान संशय आल्याने माझेकडून लाच रक्कम न स्विकारता ''आता तुम्हाला लाहेरीलाच बोलवतो'', असे बोलून निघून गेल्याने पुन्हा त्यांचेकडून लाहेरी येथे बोलविण्याची वाट पाहत पुढील कारवाई करण्याचा दोन्ही पंचांसमक्ष निर्णय घेऊन पोनि पाटील साहेबांनी मला सुचना दिली की, डॉ. भोकरे यांनी मला फोन करून लाहेरी येथे लाच रक्कम घेउन बोलाविल्यास पुन्हा तात्काळ पुढील कारवाई कामी ला. प्र.वि. गडचिरोली येथे हजर येण्याच्या सुचना दिल्या. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 4 मध्ये नमुद आहे.

डॉ. भोकरे हे मला लाच रक्कम घेउन लाहेरी येथे बोलवतो असे सांगितले होते परंतु त्यांचे फोनची दि. 25/03/2025 रोजी पर्यंत वाट पाहली असता, त्यांनी फोन केलेला नसल्याने मी दिनांक 25/03/2025 रोजी 10.00 वा. ला.प्र.वि.कार्यालय गडचिरोली येथे येवुन पोलीस निरीक्षक श्री. संतोष पाटील यांना भेटुन डॉ. भोकरे यांना कुठल्यातरी कारणाने माझेवर संशय आला असावा, त्यामुळे डॉ. भोकरे यांनी मला फोन करून लाहेरी बोलवले नसेल तरी आज एक वेळ त्यांना फोन लावुन बोलुन बघतो असे सांगीतल्याने पोनि पाटील साहेबांनी सापळयाचे आयोजन करून सापळा कारवाई मधील सदस्यांची ओळख करवुन देवुन लगेच या कारवाईत यापुर्वी पंच म्हणुन काम केलेले दोन शासकिय पंचांना बोलाविले.

पंच आल्यावर लाहेरी हे ठिकाण गडचिरोली येथुन खुप लांब अंतरावर घनदाट जंगलाने वेढलेल्या ठिकाणी व नक्सलदृष्ट्या पोलीसांच्या कारवाई करीता अति संवेदनशील व अति धोकादायक असल्याने पोनि पाटील साहेबांनी मला व दोन्ही पंचांना सदर कारवाई मोबाईल फोनवरून करण्याचा निर्णय घेवुन पडताळणीच्या सविस्तर सुचना दिल्यावर त्यांच्या सुचनेनुसार पोशि घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन व्हॉईस रेकॉर्डर रेकॉर्डीग मोडवर ठेवुन वेळ 12.15 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजात संभाषण रेकॉर्ड केल्यानंतर माझा मोबाईल क्र. 7350271778 ने डॉ. भोकरे यांचा मोबाईल क्र. 7743925289 यावर 12.16 वा. तसेच 12.17 वा. व 12.19 वा. तिनवेळा नॉर्मल कॉलने संपर्क केलो असता डॉ. भोकरे यांना नॉर्मल फोन लागला मात्र त्यांनी कॉल रिसीव्ह न करता माझा फोन काटुन टाकला व बंद करून ठेवला. यामुळे डॉ. भोकरे यांना संशय आल्याने ते यापुढे माझेकडुन लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री झाली असल्याने त्यांचेवर पुढील कायदेशीर कारवाई करणेकरीता लेखी निवेदन सादर केले आहे. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 5 मध्ये नमुद आहे.

तरी दिनांक 03/02/2025 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई वेळी डॉ. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी यांनी मला मी प्राथमिक आरोग्य केंद्र लाहेरी येथील कर्तव्यकाळात हजर असतांना फेब्रुवारी 2024 ते सप्टेंबर 2024 व नोव्हेंबर महिन्याचे 14 दिवसाचे रोखलेल्या पगाराचे पुरवणी बिलाकरीता कार्यालय प्रमुख म्हणुन लागणारे त्यांच्या सहीचे ना देय प्रमाणपत्र देण्याकरीता 1,50,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून पंचासमक्ष तडजोडीअंती 1,30,000/-रू. ची सुस्पष्ट मागणी केली असल्यामुळे डॉ. संभाजी भोकरे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लाहेरी यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल खबर माझे सांगणेप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर मी ती स्वता वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
खबर

हि लिहुन दिली

(संतोष पाटील)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Santosh Budha Patil
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** dgpsbpm8008
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Revchand Khushal S
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402RKSM810

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)